# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पंतप्रधान आज तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार
- विकसित भारताच्या उभारणीसाठी भारत नशामुक्त होणं आवश्यक असल्याचं गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- छत्रपती संभाजीनगर इथं २२ मोठ्या प्रकल्पांच्या माध्यमातून ३५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार–उद्योगमंत्री उदय सामंत यांची माहिती
- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या सर्व आरोपींविरुद्ध मकोका लागू
  आणि
- जालना इथं आयोजित तीन दिवसीय महाचिंतनीचा समारोप

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे.

दरम्यान, अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. या निमित्तानं अयोध्येत कालपासून विविध कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

****

विकसित भारताच्या उभारणीसाठी, भारत नशामुक्त होणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत 'अंमली पदार्थ-तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा' या विषयावरच्या परिषदेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते. अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचं तसंच मानस-दोन या हेल्पलाईन सेवेच्या सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या विस्ताराचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते झालं. गेल्या दहा वर्षांत सुमारे २४ लाख किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले, पुढच्या काही दिवसांतही अंमली पदार्थांचा मोठा साठा नष्ट करण्यात येणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, अमित शहा आज अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून, ते शनिशिंगणापूर आणि शिर्डीला भेट देणार आहेत. शिर्डीमध्ये होणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनाला ते उपस्थित राहणार आहेत.

****

प्रदुषण नियंत्रणात योग्य कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भात विविध विभागांची बैठक घेतल्यानंतर त्या बोलत होत्या. नद्यांमधल्या जलप्रदुषणाला आळा घालण्यासह नदी पुनरुज्जीवनासंबंधी भूमिका मांडताना त्या म्हणाल्या,

**महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी वॉटर पल्युशनचा फार मोठा विषय आहे. वेस्ट मॅनेजमेंट जे महानगरपालिकांचं आहे, ज्याला आमचं जे खातंय ते बजेट देतं पण ते बजेट ते खर्च करत नाहीयेत. याचाही मी चांगला आढावा घेतलाय. आणि कोस्टल रोडमध्ये पण जे प्रदुषण आहे, त्याचाही चांगला आढावा घेतलाय. आणि या लोकांना चांगल्या पद्धतीने नोटीसा बजावण्यात येतील. त्यांनी जर त्यांच्या कामामध्ये कचुराई केली, तर त्यांच्यावर अ‍ॅक्शन घेण्यात येईल. आणि या प्रदुषणाच्या बद्दल कडक कारवाई करण्यात येईल. नदी पुनर्जीवनाचं एक चांगलं काम त्याच्यातनं करता येईल. नद्या ज्या प्रदुषित होतायत, त्या नद्या एक एक नदी प्रत्येक ठिकाणाची घेऊन त्याच्यावर आम्ही एस टी पी लावून त्याच्या बाबतीत काय करता येईल.**

छत्रपती संभाजीनगर आणि लातूर जिल्ह्यातल्या पशुसंवर्धन विभागाची मुंडे यांनी काल आढावा बैठक घेतली. तालुका पातळीवरील पशुवैद्यकीय दवाखाने तसंच पदभरतीबाबतही प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी सबंधित यंत्रणेला दिले.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याला १४ जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानिमित्ताने पहिला अभिनंदन सोहळा काल छत्रपती संभाजीनगर इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात साजरा झाला, या सोहळ्यात बोलतांना सामंत यांनी, १७ देशांत ६० मराठी मंडळं कार्यरत असल्याची माहिती दिली. मराठी भाषा संवर्धनासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, असं सांगताना, भाषा संवर्धन पंधरवड्यात सर्व शैक्षणिक संस्थांना मराठी भाषेसंदर्भात किमान एक कार्यक्रम घेण्याची सूचना करण्याचं आवाहन सामंत केलं. ते म्हणाले...

**१४ जानेवारी पासून २८ जानेवार पर्यंत भाषा संवर्धन पंधरवाडा आम्ही साजरा करत आहोत. आपण जर सगळ्या कॉलेजेस् आणि शाळा आपण जर निदेर्श दिले की या पंधरा दिवसा मध्ये किमान एक जरी कार्यक्रम  मराठी भाषेचा केला तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ देशातल पहिल विद्यापीठ असेल ज्याने मराठी भाषा ही घराघरा पर्यंत पोहचवण्याचं काम केलं.**

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं औद्योगिक विकासाबाबत सामंत यांनी काल बैठक घेतली. शेंद्रा औद्योगिक वसाहतीत ऑरिक सिटीत झालेल्या या बैठकीत मराठवाड्यात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ४६ औद्योगिक क्षेत्रांशिवाय आणखी ३३ औद्योगिक क्षेत्र स्थापन करणं प्रस्तावित असल्याचं सांगण्यात आलं.

या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलतांना सामंत यांनी, छत्रपती संभाजीनगर औद्योगिक परिसरात २२ मोठ्या प्रकल्पांनी भूखंडाची मागणी केली असून, या माध्यमातून ३५ हजार कोटी रुपये गुंतवणूक येणार असल्याची माहिती दिली. मराठवाड्यात उभारण्यात येत असलेल्या उद्योग भवनांबाबत त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले...

**मराठवाड्यामध्ये चार उद्योग भवन आपण बांधतोय. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव. याची कामं सुरू झालेली आहेत. काही कामं ही पहिल्या**

**स्लॅबपर्यंत आलीत, दुसऱ्या स्लॅबपर्यंत आलीत. येत्या वर्षभरात ही कामं पूर्ण होतील.**

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध कायदा–मकोका लागू करण्याचे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी काल याबाबत माहिती दिली.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणातले आरोपी तसंच परभणी इथल्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणातल्या दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी काल धाराशिव तसंच वाशिम इथं सर्व पक्षीय, सर्व धर्मीय संघटनांकडून मोर्चा काढण्यात आला.

****

सहकार विभागाच्या माध्यमातून गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचं, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यात किनगाव इथं रस्ते विकास कामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते काल बोलत होते. या संस्थांना आर्थिक सहाय्य देवून त्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी गोदाम उभारणी, विविध सेवांचा पुरवठा, कामकाजाचं संगणकीकरण आदी सहकार्य करण्यात येत असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

****

**या बातम्या अआकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत**

****

महिलांच्या खो–खो विश्वचषक स्पर्धेला उद्यापासून दिल्लीत प्रारंभ होत आहे. या स्पर्धेत सहभागी भारतीय संघाच्या कर्णधारपदी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातल्या कळंब आंबा इथल्या प्रियंका इंगळेची निवड झाली आहे. या निवडीबद्दल तिचे वडील हनुमान इंगळे यांनी आकाशवाणीशी बोलतांना आनंद व्यक्त केला आहे...

**हनुमंत इंगळे (प्रियंका इंगळेचे वडील)**

**तिला वर्ल्डकप साठी संधी मिळाली, व वर्ल्डकपला सलेक्शन होऊन ती आता भारतीय संघाची कर्णधार याची निवड होऊन वडील या नात्याने मी भरपूर आनंदात आणि खूश आहे.**

****

जालना इथं आयोजित तीन दिवसीस महाचिंतनीचा काल समारोप झाला, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यावेळी उपस्थित होते. चक्रधर स्वामींनी मानवधर्माला सर्वोच्च प्राधान्य दिलं, अज्ञान, अंधश्रद्धेतून समाजाला मुक्त करण्याचं कार्य केलं, त्यासोबतच वर्ण, जाती, व्यवस्थेला आव्हान दिलं, असं बागडे यावेळी म्हणाले. नागपूर इथले संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. कोमल ठाकरे यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते यंदाचा चिंतनी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

****

ज्येष्ठ समीक्षक डॉक्टर सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल काल नांदेड इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदेड आणि पळसा शाखांतर्फे त्यांचा समारंभपूर्वक सत्कार करण्यात आला. आज मराठी वाङ्मय, मराठी संस्कृतीची दुरवस्था झाली आहे, त्यामुळे मराठी भाषा, मराठी संस्कृती वाचवण्यासाठी आपली सांस्कृतिक अस्मिता पुनर्जागृत केली पाहिजे, असं रसाळ यावेळी म्हणाले.

****

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्राध्यापक डॉ. पृथ्वीराज तौर यांना दिल्ली इथं होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित करण्यात आलं आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हे निमंत्रण मिळणं अभिमानास्पद असल्याची भावना डॉ. तौर यांनी व्यक्त केली आहे...

**माझ्या आयुष्यातल्या एकूण परमोच्च आनंद क्षणांपैकी हा एक क्षण आहे असं मला वाटतंय. मी जे काम मागच्या तीन दशकांपासून करतोय, मागच्या तीस वर्षांपासून भाषांतर, प्रत्यक्ष कविता लेखन, आणि नंतर मागच्या वीस वर्षांपासून मराठी भाषेतल्या संदर्भातला काही संशोधन करतोय, त्या एकूणच कार्याचा हा सन्मान आहे, असं मला वाटतंय. हा सन्मान केवळ माझाच आहे असं नाही, तर मी ज्या**

**ठिकाणी काम करतोय त्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचाही सन्मान आहे.**

****

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी महोत्सवाच्या पाचव्या दिवशी काल पारंपरिक जलयात्रा काढण्यात आली. या महोत्सवानिमित्त, तुळजापूर इथं राज्यस्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा, 'स्पर्धा तुळजाभवानीची...वक्ता महाराष्ट्राचा' काल घेण्यात आली. राज्याच्या विविध जिल्ह्यातून ३०७ शालेय स्पर्धक यात सहभागी झाले होते.

****

लातूर इथं काल मुख्याध्यापक संघाच्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचा समारोप झाला. यावेळी विविध १४ ठराव पारित करण्यात आले. राज्यस्तरीय शैक्षणिक निर्णय प्रक्रियेत मुख्याध्यापक संघास सहभागी करून घ्यावं, आरटीई कायद्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ पासून संच मान्यतेमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येवर आधारित वाढीव शिक्षक पदे मंजूर करून त्यास मान्यता द्यावी, आदी ठरावांचा यात समावेश आहे.

****

नांदेडमध्ये ५९ व्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनाचं उद्घाटन काल राज्याचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या हस्ते झालं. या अधिवेशनात आज तज्ज्ञांच्या व्याख्यानासह परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते सिद्धा महोत्सवाचं उद्धघाटन करण्यात आलं. या महोत्सवात विविध वस्तूंचे एकूण ४५ स्टॉल उभारण्यात आले आहेत.

****